# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 18 November 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १८ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संपत असून, येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्यातल्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी, एक लाख ४२७ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मतदान पथकं रवाना होत आहेत.

****

दरम्यान, आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, जाहीर सभा आणि रोड शो सोबतच पदयात्रा आणि मतदारांच्या गृहभेटी घेण्यावर उमेदवारांचा कल दिसून येत आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकरी आणि महिला सक्षमीकरणावर आघाडीचा भर असल्याचं ते म्हणाले. राज्यातले अनेक उद्याग इतर राज्यात नेण्यात आल्याचं सांगून त्यांनी, केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली.

****

भारतीय जनता पक्षाच्या खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौत यांनी आज मध्य नागपूर विधानसभा मतदार संघातले भाजपाचे उमेदवार प्रविण दटके यांचा प्रचारार्थ रॅलीत सहभाग घेतला.
भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आज पुणे, नागपूर आणि वर्धा इथं सभा होणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बीड जिल्ह्यात आष्टी इथं महायुतीचे उमेदवार बाळासाहेब आजबे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. पवार यांच्या आज फलटण, इंदापूर आणि बारामती इथं देखील सभा होणार आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची सांगता सभा आज बारामतीत होणार आहे.

****

भाजप निवडणुकीत दिलेला कोणताच शब्द पाळत नाही, असा आरोप कर्नाटकचे उपमुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते डी. के.शिवकुमार यांनी केला आहे. ते काल लातूरमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. काँग्रेसने कर्नाटक विधानसभा निवडणुकीत जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासनं पूर्ण केल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.
दरम्यान, जळकोट इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी उदगीर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सुधाकर भालेराव यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

****

नाशिक जिल्ह्यात सिन्नर विधानसभा मतदारसंघातले महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार शरद शिंदे यांची पक्षाने हकालपट्टी केली आहे. ते पक्षाचे उमेदवार नाहीत असंही स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाने शिंदे यांना उमेदवारी दिली होती, मात्र ते पक्ष शिस्तीचं पालन करत नसून, पक्षाच्या नेत्यांना विश्वासात न घेता चुकीच्या पद्धतीने प्रचार करत आहेत, त्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

****

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी तसंच बंजारा तांड्यातल्या अधिकाधिक नागरिकांनी मतदान करावं, यासाठी जालना जिल्ह्यात मंठा तालुक्यातल्या नायगाव इथल्या बंजारा महिला, घरोघरी जाऊन बंजारा बोली भाषेतून जनजागृती करत आहेत. या जनजागृतीसाठी महिलांनी बंजारा भाषेतून गीत तयार केलं आहे. पारंपरिक वेशभूषेत महिला, मतदानाचं महत्त्व सांगत आहेत. महिलांकडून होत असलेल्या या जनजागृतीचा चांगला प्रभाव आजूबाजूच्या परिसरात पडत असून, शंभर टक्के मतदान व्हावं, असं उद्दिष्ट या महिलांनी ठेवलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यात मतदार जनजागृतीसाठी स्वीप अभियानांतर्गत वोटेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. नाशिक जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या संयुक्त विद्यमानं आयोजित या वोटेथॉनमध्ये, हजारो नागरिकांनी सहभाग घेत, मतदान करण्याचा संदेश दिला. ३ आणि ५ किलोमीटर अशा दोन स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी धावपटूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. धावपटूंनी मतदान जनजागृती करणारे पोस्टर्स हातात घेऊन घोषणा देत मतदार जागृती केली.

****

निवडणूक आयोगाच्या स्विप कार्यक्रमाअंतर्गत धुळे महापालिकेच्या वतीनं शहरात घरोघरी मतदानासाठी निमंत्रण पत्रिकेचं वाटप केलं जात आहे. यासाठी नियुक्त पथकांच्या माध्यमातून प्रत्येक भागात प्रत्यक्ष गृहभेटीचं नियोजन करण्यात आलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार असून, या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी लातूर जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ही माहिती दिली. मतदान प्रक्रिया संपण्यापुर्वीच्या ७२ तासात करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत त्या काल बोलत होत्या.

****